| | | |
|---|---|---|
| महाराष्ट्र पोलीस | **पोलीस अधीक्षक, सोलापूर ग्रामीण यांचे कार्यालय,**<br>जिल्हाधिकारी कार्यालय कंपाउंड, सोलापूर.<br>दुरध्वनी क्र.०२१७-२७३२०१०/फॅ.क्र.०२१७-२७३२००८ ई-मेल-hccb. Solapur .rural@ gmail. com | |


**जा.क्र. पशा-२/पोअ/अधि-अंमलदार/मंत्रालयीन कर्म/वर्ग-४/ओळखपत्र/२०२३ सोलापूर ग्रामीण दि.१०/०७/२०२३**

**संदर्भ-:** पोलीस उपअधिक्षक (मुख्यालय) सोलापूर ग्रामीण याचेकडील पत्र क्र.आस्था-९/पो.अधि कर्म/ डिजीटल/ओळखपत्र/२०२१-५४४७ दि.२०/०६/२०२३

**विषय-:** नवीन डिजीटल ओळखपत्र तयार करणेच्या नविदा (दरपत्रके) सादर करणेबाबत.

---ooo---

## आदेश-:

उपरोक्त संदर्भाधिन विषयान्वये कळविण्यात येते की, या घटकाच्या आस्थापनेवरील सर्व पोलीस ठाणे/विभाग/शाखा व कार्यालयास नेमणूकीस असलेल्या सर्व पोलीस अधिकारी/ अंमलदार, मंत्रालयीन कर्मचारी वर्ग-४ यांना यापूर्वी देण्यात आलेल्या डिजीटल ओळखपत्राची मुदत संपल्याने नवीन ओळखपत्र बनविणे आवश्यक असल्याने शासन निर्णय भाखसं/२०१४/प्र.क्र-८२/भाग-३/उदयोग-४ दिनांक ०१ डिसेंबर २०१६ मधील नियम क्रमांक ३.२.३ मधील तरतुदीनुसार खाजगी/ अधिकृत्त पुरवठाधारक यांचेकडून निविदा (दरपत्रक) मागविण्यात येत आहेत.

**अटी व शर्ती-**

१. वरील साहित्याच्या सीलबंद निविदा प्रमुख लिपीक आस्थापना शाखा सोलापूर ग्रामीण याचेकडे जाहिरात प्रसिध्द केलेच्या दिनांकापासुन ते दि.१७/०७/२०२३ रोजी ठिक १८.०० वाजेपर्यंत समक्ष सादर कराव्यात.

२. दरपत्रक धारक यानी निविदेसोबत **१.** दरपत्रक धारक फर्मचे नाव **२.** दरपत्रक धारकांचे पुर्ण नाव **३.** पत्ता व दुरध्वनी क्रमांक व ई-मेल **४.** शॉपअॅक्ट लायसन्स/संस्थेचे नोंदणी प्रमाणपत्र **५.** पॅनकार्ड व आधार कार्ड **६.** ओळखपत्र या पूर्वी कोणत्या शासकिय कार्यालयास पुरवठा केले असल्यास त्या कार्यालयाचे पुरवठा आदेशाची छायांकित प्रत जोडणे बंधनकारक आहे. ७.जी.एस.टी नोंदणी प्रमाणपत्र,आयकर/जी.एस.टी.भरल्याचे प्रमाणपत्र इत्यादी जोडणे आवश्यक आहे.

३. ओळखपत्रासोबत पोलीस अधिक्षक सोलापूर ग्रामीण असे नमूद केलेली लेस,व अॅल्युमिनियम होल्डर देणे आवश्यक आहे. (लेस व अॅल्युमिनियम होल्डर चा नमुना निविदा देणे पूर्वी प्रमुख लिपीक आस्थापना शाखा याना दाखविणे आवश्यक आहे.)

४. ओळखपत्राच्या दोन्ही बाजूस प्रिंट असलेले PVC कार्ड देणे आवश्यक आहे.

५. ओळखपत्र तयार करणेकरिता लागणारी सर्व माहिती पोलीस ठाणे उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय, शाखा येथील प्रभारी अधिकारी याचे मार्फतीने वेबसाईट लिंक द्वारे संकलित करुन घ्यावी लागेल. लिंक केलेली वेबसाईट आस्थापना शाखा याचेकडे १ वर्षाकरिता राहिल.वेबसाईटच्या लिंकसह खर्चाच्या निविदा सादर करणे आवश्यक आहे.

६. दरपत्रक मंजूर झालेनंतर ओळखपत्राचा पुरवठा विहित मुदतीत करणे पुरवठाधारक यांचेवर बंधनकारक असेल.

वरील अटी व शर्ती विचारात घेवून कार्यालयीन ओळखपत्र तयार करणेकरिता निविदा पुरवठा करणे बाबतचे दरपत्रक (निविदा) या कार्यालयाच्या **www.solapurpolice.gov.in** या संकेतस्थळावर प्रसिध्द केलेनंतर **दिनांक.१७/०७/२०२३ रोजी ठिक.१८.०० वाजेपर्यंत** प्रमुख लिपीक आस्थापना शाखा सोलापूर ग्रामीण येथे सादर कराव्यात. विहित मुदती नंतर प्राप्त दर पत्रके (निविदा) स्विकारली जाणार नाहीत.

**पोलीस अधिक्षक याचे मान्यतेने.**

**( विजयालक्ष्मी कुर्री )**
**पोलीस उपअधिक्षक(मुख्या),**
**पोलीस अधिक्षक सोलापूर ग्रामीण,**
**यांचेकरिता.**

प्रति, पोलीस निरीक्षक सायबर पोलीस ठाणे सोलापूर ग्रामीण.
२/- वरील ओळखपत्र तयार करणेची जाहिरात निविदा या मथळयाखाली कार्यालयाच्या **www.Solapurpolice .gov.in** या संकेतस्थळावर प्रसिध्द करावी.

**प्रत- प्रमुख लिपीक आस्थापना /पत्रव्यवहार शाखा सोलापूर ग्रामीण.**

१. **या पुढे प्रतिवर्षी ओळखपत्र देण्यात येवू नये. २. पोलीस अंमलदारांची बदली जिल्हयाबाहेर होत नाही. त्यामुळे त्यांना त्यांचे सेवानिवृत्तीचा दिनांक टाकून ओळखपत्र दयावे ३. पदोन्नती झाल्यावर बदलण्यात यावे. ४. अधिकारी सुध्दा जिल्हयाबाहेर बदलून गेल्यावर त्यांचेकडून ओळखपत्र जमा करुन घ्यावे. या सुचनाचे पालन करावे.** तसेच वरील सीलबंद निविदा प्राप्त झालेनंतर आपल्या अहवालासह या कार्यालयास तात्काळ सादर करण्यात याव्यात.